# पंढरी संचार

• पंढरपूर • बुधवार, ११ डिसेंबर २०२४
• किंमत ₹ ४ • पाने : ८

pandharisanchar.com | RNI-MAH-MAR/1499/2000 | • वर्ष २९ • अंक - २०१





माढा मतदारसंघात परिवर्तनाची सुरुवात छत्रपतींच्या स्मारकाने... PII






पंढरपूर अर्बन को-ऑप. बँकेच्या बारामती शाखेत शाखाधिकाऱ्याने केला ... PIII



## » At a Glance

### व्हीएम सुरक्षितच, तर गुन्हे दाखल करणार



**सोलापूर :** माळशिरस मतदारसंघातील मारकडवाडी गावातील निवडणूक प्रक्रिया निवडणूक आयोगाच्या सर्व नियमांचे पालन करत पारदर्शकपणे पार पडली आहे. लोकप्रतिनिधीत्व नियम 1951 नुसार भारत निवडणूक आयोग व्यतिरिक्त कोणालाही मतदान प्रक्रिया घेता येत नाही म्हणून गावकऱ्यांना मतदान घेऊ दिले नाही, ईव्हीएम सुरक्षित आहे. यामध्ये अजिबात गडबड घोटाळा करता येत नाही, ज्यांना शंका आहे, ईव्हीएमविरोधात अफवा पसरवणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात येईल, असा इशारा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी पत्रकार परिषद घेऊन दिला

### गादेगावातील १२ जणांविरुद्ध गुन्हा दाखल



**पंढरपूर :** मारकडवाडी (ता. माळशिरस) येथील लोकांचे अनुकरण करून गादेगाव (ता. पंढरपूर) येथील ईव्हीएम मशीनविषयी आक्षेपार्ह विधान करून जनमानसात प्रशासनाची प्रतिमा मलीन करण्याच्या उद्देशाने बेकायदेशीर जमाव जमवून समाजामध्ये द्वेष पसरविला असल्याचे कारण दाखवून पोलिस प्रशासनाकडून १२ आंदोलनकर्त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रणजित बागल, बाळासाहेब बागल, समाधान फाटे, नवनाथ बागल, अतुल फाटे, बाजीराव बागल, महादेव माने, योगेश बागल, दिगंबर बागल, सुभाष रोकडे, संजय कदम, आकाश मांडवे यांच्याविरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

### महूदमध्ये ७४ हजार रुपयांची तांब्याची तार चोरीस



**सांगोला :** अज्ञात चोरट्याने इलेक्ट्रिकल दुकानाच्या पत्रा शेडचे शटर उचकटून दुकानातील ७४ हजार रुपये किमतीची ३६० किलो तांब्याची वायर चोरून नेल्याची घटना महूद (ता. सांगोला) येथे घडली. या प्रकरणी स्वप्नील विकास देशमुख यांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध सांगोला पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. याबाबत पोलिस अधिक तपास करीत असल्याचे सांगण्यात आले.

### महाराष्ट्रात थंडीचा कडाका वाढला!



**सोलापूर :** उत्तर वाऱ्यांमुळे महाराष्ट्रात कमाल आणि किमान तापमानात मोठी घट झाली आहे. पुण्यात 13-14 अंश तापमानाची नोंद झाली असून पुढील काही दिवसांत ते 10 अंशांवर घसरू शकते. मुंबईतही थंडी तीव्र होणार आहे. उत्तर महाराष्ट्रात गारठा वाढला असून नागरिकांनी शेकोट्या पेटवायला सुरुवात केली आहे. पुढील दहा दिवसांत राज्यभरात कडाक्याची थंडी पडण्याची शक्यता आहे.

## ईव्हीएम मतदान म्हणजे संविधानाने केलेले मतदान

# पवार त्यालाच विरोध करतात

## : आ. सदाभाऊ खोत

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**माळशिरस :** लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला चांगले यश मिळाले. त्यामुळे खा. शरद पवार खुशीत होते; मात्र विधानसभा निवडणुकीत म्हणावे तसे यश मिळाले नाही. यामुळे त्यांनी मतदान यंत्रावर संशय व्यक्त करून नाराजी व्यक्त केली व मतदान प्रक्रिया बदलावी, अशी मागणी केली शरद पवारांची ही मागणी महापाप असल्याचे आमदार गोपीचंद पडळकर यांनी सांगितले.माळशिरस विधानसभा मतदार संघातील मारकडवाडी ग्रामस्थांनी मतदान यंत्रावर संशय व्यक्त करून पुन्हा बॅलेट पेपरवर मतदान घेण्याचा प्रयत्न केला; प्रशासनाने हा प्रयत्न हाणून पाडला. यानंतर येथे खा. शरद पवार यांनी येऊन ग्रामस्थांचे कौतुक केले व मतदान यंत्रावर निवडणूक न घेता बॅलेट पेपरवर घेण्यात यावी. अशी मागणी केली. यानंतर मारकडवाडी गावात आज मंगळवारी आमदार गोपीचंद पडळकर, माजी मंत्री सदाभाऊ खोत यांनी भेट देऊन मतदान यंत्राच्या बाजूने मते मांडली. यावेळी गोपीचंद पडळकर म्हणाले, मारकडवाडी ग्रामस्थांनी बॅलेट पेपरवर निवडणूक घेण्याची तयारी सुरू केली. तेव्हा हे गाव देश पातळीवर प्रसिद्धीस आले मात्र यावेळी एकच बाजू जगासमोर ठेवण्यात आली होती. सभेस उपस्थित असलेल्या लोकांना आमदार पडळकर यांनी तुम्हाला बॅलेट पेपरवर मतदान हये की यंत्रावर तेव्हा नागरिकांनी आम्हाला यंत्रावर मतदान हवे, असे म्हणून हात उंचावून प्रतिसाद दिला. पडळकर म्हणाले. या गावात धनगर समाज १० टक्के आहे. त्यांनी नेहमी महायुतीला साथ दिलेली आहे. १०० शकुणी मेल्यावर एक शरद पवार जन्माला आले आहेत. लोकशाही मजबूत करण्यासाठी धनगर समाजाने नेहमीच सहकार्य केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील कपटी व जातीयवादी आहेत. यामुळेग्रामस्थांनी आता महाविकास आघाडीच्या नेत्यापासून सावध राहावे, असे आमदार पडळकर यांनी सांगितले.

मारकडवाडी ग्रामस्थांनी इतिहास केला. तुमची दखल देशपातळीवर घेण्यात आली. माजी पंतप्रधान कै. राजीव » पान 3 वर

## अशी राम सातपुते सारखी मंडळी मोहिते पाटलांचे दररोज बूट पुसायला असतात - आ.जानकर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**माळशिरस :** अशी राम सातपुते सारखी मंडळी मोहिते पाटलांचे दररोज बूट पुसायला असतात त्यामुळे मोहिते पाटलांपुढे हा राम सातपुते किस झाड की पत्ती... सातपुते हे पाच महिने बेंगलोर येथील मेंटल हॉस्पिटलमध्ये होते त्यामुळे ते वैफल्यग्रस्त झालेले दिसत आहेत असे प्रत्युत्तर माळशिरस तालुक्याचे आमदार उत्तमराव जानकर यांनी दिले आहे.

मारकडवाडी येथे ईव्हीएम च्या समर्थनार्थ माजी आमदार राम सातपुते, आ.गोपीचंद पडळकर आणि आ.सदाभाऊ खोत यांची सभा पार पडली यामध्ये त्यांनी मोहिते-पाटील आणि शरद पवार यांच्यावर टीका केल्यानंतर माळशिरस तालुक्याचे आमदार उत्तमराव जानकर यांनी देखील याला दिल्ली येथून प्रसार माध्यमांशी बोलताना जोरदार प्रत्युत्तर दिले. ते म्हणाले की, २०२९ ची राम सातपुते यांनी वाट पाहण्यापेक्षा माझ्याबरोबर निवडणूक आयोगाकडे यावे आणि बॅलेट पेपरवर मागणी करावी त्यांना आमदार होण्याची संधी आहे मात्र ते का घाबरत आहेत.मोहिते पाटलांवर ते टीका करताना दिसत आहेत मात्र राम सातपुते सारखी मंडळी दररोज मोहिते पाटलांचे बूट पुसायला असतात.

बॅलेट पेपर मतदान घ्यावे अशी मारकडवाडी ग्रामस्थांची इच्छा आहे आणि आता देशाच्या कानाकोपऱ्यातून ही मागणी वाढताना दिसते आहे. प्रत्येकाच्या मनात आपले मत गेले कुठे याबाबत शंका आहे त्यामुळे त्यांना त्यांच्या प्रश्नांचे उत्तर मिळाले पाहिजे.ही लढाई न्याय मिळेपर्यंत संपणार नाही.कोणी मारकडवाडीत सभा घेऊन लोकांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करत असेल तर लोक त्यांच्याच भाषेत उत्तर देतील. » पान 3 वर

## विठ्ठल टोकन दर्शनासाठी टीसीएस कंपनीची संगणक प्रणाली - ह.भ.प.औसेकर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** विठ्ठल रुक्मिणी दर्शनासाठी भाविकांची संख्या वाढत आहे. यामुळे भाविकांना सुलभ दर्शन मिळावे यासाठी तिरुपती व शिर्डीच्या धरतीवर पंढरपूर येणार आहे. या सुविधेसाठी टीसीएस कंपनीची संगणक प्रणाली वापरण्यात येणार असल्याची माहिती मंदिर समितीचे सहअध्यक्ष ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली. विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीची बैठक भक्त निवास येथे सहअध्यक्ष अवसेकर महाराज यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या बैठकीस मंदिर समितीचे सदस्य ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज जळगावकर, ह.भ.प. प्रकाश महाराज जवंजाळ, अतुल शास्त्री भगरे, शिवाजी मोरे, डॉ. दिनेश कदम, संभाजी शिंदे, डॉ. माधवी निगडे, शकुंतला नडगिरे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक मनोज श्रोत्री आदी उपस्थित होते . बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना ह.भ.प. अवसेकर महाराज म्हणाले, पंढरपूर राज्यातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असल्याने विठ्ठलाच्या दर्शनासाठी भाविकांची संख्या वाढत आहे. यामुळे भाविकांचा वेळ वाचावा त्यांना सुलभ दर्शन मिळावे म्हणून मंदिर समितीने तिरुपती व शिर्डीच्या धरतीवर भाविकांना टोकन दर्शन देण्याचा निर्णय घेतला आहे. ही सुविधा देण्यासाठी टीसीएस कंपनीची संगणक प्रणाली वापरण्यात येणार आहे. मंदिरात सुरक्षेसाठी खाजगी सुरक्षा कंपनी नेमण्यात आली आहे. सुरक्षा कर्मचाऱ्यांबाबत तक्रारी येत आहे. याची दखल घेऊन कंपनीस अंतिम नोटीस देण्यात येणार आहे असे सांगून औसेकर म्हणाले, विठ्ठलाच्या दर्शनासाठी आलेले भाविक विठ्ठल रुक्मिणी फुलांचे हार अर्पण करतात. यामुळे मोठ्या प्रमाणावर निर्माल्य साठते. यापासून धूप व अगरबत्ती तयार करण्यात येणार आहे. याचा ठेका देण्यात आला आहे. विठ्ठल रुक्मिणी मंदिर व परिवार देवतांचे संवर्धन व पुरातन लुक देण्यासाठी शासनाने 150 कोटी रुपये मंजूर केले आहेत. या कामाचा आढावा घेण्यात आला. भाविकांना सोयी सुविधा देण्यासाठी मंदिर समितीकडून सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत आहे.



## मोहिते पाटलांना वर्षभरात तुरुंगात टाकणार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माळशिरस :** माळशिरसचे भाजपचे माजी आमदार राम सातपुते यांनी पुन्हा एकदा अकलूजमधील मोहिते पाटलांना डिवचलं आहे. मोहिते पाटलांनी बँका, पतसंस्था बुडवल्या आहेत. आता विनंती करण्याचे, सूचना करण्याचे दिवस गेले आहेत. आता सरकार आपलं आहे. मोहिते पाटील यांना वर्षभरात तुरूंगात टाकणार आहे. तुरूंगात टाकलं नाही तर राम सातपुते नाव लावणार नाही, असा निर्धार राम सातपुते यांनी केला आहे. ते देशभरात प्रसिद्ध झालेल्या मारकडवाडी येथे बोलत होते. त्यामुळे आता मोहिते पाटलांचे समर्थक आक्रमक झाल्याचे दिसत आहे.

## विधान परिषदेवर कोणाची वर्णी लागणार परिचारक, राऊत, सातपुते, पाटील इच्छुक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** राज्यपाल नियुक्त पाच सदस्यांची विधान परिषदेवर निवड करावयाची आहे. यावर आपली वर्णी लागावी यासाठी सोलापूर जिल्ह्यातून माजी आमदार राजेंद्र राऊत, प्रशांत परिचारक ,राम सातपुते, शहाजी बापू पाटील यांच्या नावाची चर्चा सुरू आहे. कोणाला संधी मिळणार याकडे लक्ष लागले आहे. राज्यपाल नियुक्त १२ आमदारांची निवड विधान परिषदेवर करावयाची होती. यासाठी विधानसभा निवडणुकीच्या अगोदर महायुती शासनाने सात जणांची नियुक्ती केली आहे. विधानसभा निवडणूकीत अनेक जण निवडणुकीत उभे राहण्यास तयार होते. मात्र बंडखोरी होऊ नये म्हणून महायुतीमधील नेत्यांनी सावध भूमिका घेऊन त्यांना विधान परिषदेवर निवड करण्यात येईल असे आश्वासन दिले आहे. विधानसभा निवडणुकीत महायुतीमधील काही आमदारांचा पराभव झाला आहे. यामुळे त्यांची विधान परिषदेवर वर्णी लावण्यासाठी हालचाली सुरू झाल्या आहेत. सोलापूर जिल्ह्यातून विधान परिषदेवर निवड व्हावी म्हणून माजी आमदार राजेंद्र राऊत, प्रशांत परिचारक, राम सातपुते, शहाजी बापू पाटील हे चार जण इच्छुक आहेत. बार्शी विधानसभा मतदार संघात राजेंद्र राऊत यांचा पराभव झाला. सांगोला विधानसभा मतदार संघात शहाजीबापू पाटील यांचा पराभव झाला. माळशिरस » पान ३ वर

## बांगलादेशात हिंदूंवर अन्याय ; पंढरपुरात सकल हिंदू समाजावतीने मूक मोर्चा



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** बांगलादेशमध्ये हिंदूवर अन्याय अत्याचार केला जात आहे. याचा निषेध करण्यासाठी पंढरपुरात सकल हिंदू समाजावतीने तहसील कार्यालयावर भव्य मूक मोर्चा काढून घटनेचा निषेध करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज चौकातून मूक मोर्चा सुरुवात करण्यात आली. या मोर्चात महिला व पुरुष मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मोर्चा स्टेशन रोड मार्गे तहसील कार्यालयावर पोहोचला. येथे बांगलादेश येथे घडलेल्या घटनेचा निषेध करण्यात आला तर तेथील हिंदूंना संरक्षण देण्यात यावे अशी मागणी निवेदन देऊन करण्यात आली. यावेळी युवा नेते प्रणव परिचारक व विविध हिंदुत्ववादी संघटनेचे पदाधिकारी नागरिक उपस्थित होते.

## पिंपळनेर येथे वाहनाच्या धडकेत कामगार ठार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**माढा :** अज्ञात वाहनाच्या चालकाने दुचाकीला समोरून दिलेल्या धडकेत दुचाकीवरील एक जण ठार तर एक जण जखमी झाला आहे. पिंपळनेर शिवारातील एक मंगल कार्यालयासमोर घडली. याबाबत मृताचा भाऊ गणेश धोंडीराम गायकवाड (रा. मिरे, ता. माळशिरस) यांनी अज्ञात वाहनाच्या चालकावर गुन्हा दाखल केला आहे. तुषार धोंडीराम गायकवाड असे अपघातात मृत झालेल्या तरुणाचे नाव असून सार्थक धनाजी पेठकर असे जखमीचे नाव आहे. सदर अपघात प्रकरणी पोलीसांनी अज्ञात वाहनास शोधण्यासाठी पोलीस पथक तयार करण्यात आले असल्याचे सांगण्यात आले.

## भेट...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**माळशिरस :** काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी आज मंगळवारी मारकडवाडी गावास भेट देऊन ग्रामस्थांची संवाद साधला व ईव्हीएम मशीन बाबत चर्चा केली. याप्रसंगी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## अपहार, चोरीबाबत बँकेकडे विमा पॉलिसी कार्यरत

# पंढरपूर अर्बन बँकेच्या व्यवहारावर कोणताही परिणाम नाही- मुळे

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पंढरपूर अर्बन बँकेच्या बारामती शाखेमधील व्यवस्थापकाने केलेल्या नऊ कोटी अपहाराचा कोणताही परिणाम बँकेच्या व्यवहारावर होणार नसून खातेदारांची सर्व रक्कम सुरक्षित आहे. याबाबत बँकेची सर्व रक्कम वसुलीची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती बँकेचे चेअरमन सतीश मुळे यांनी दिली.

पंढरपूर बँकेच्या बारामती शाखेचा व्यवस्थापक अमित प्रदीप देशपांडे याने आपल्या पदाचा गैरवापर करत नऊ कोटी तीन लाख रुपयाचा अंतर्गत बँकिंग फसवणूकीचा आर्थिक गैरव्यवहार केला आहे. याप्रकरणी बँकेने बारामती शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून देशपांडे याने गुन्ह्याची कबुली देखील दिली आहे. बँकेच्या अंतर्गत तपासणीमध्ये एक महिन्यापूर्वी सदर आर्थिक अपहार केल्याची माहिती समोर आली. यानंतर तातडीने बँकेच्या अधिकाऱ्यांनी देशपांडे याची व त्याच्या कुटुंबातील सदस्यांची सर्व खाती गोठवली आहेत. हा प्रकार फक्त बारामती शाखेपुरता मर्यादित असून कोणत्याही ग्राहकांच्या खात्याशी संबधित नाही. यामुळे बँकेच्या कोणत्याही खातेदाराचे नुकसान झाले नाही.



शाखास्तरावर बनावट नावाची खाते काढून व्यवस्थापक देशपांडे याने हा प्रकार केला आहे. यामध्ये कोणत्याही ग्राहकांचे नुकसान झाले नसलेचे मागील १५-२० दिवसांचे तपासणी दरम्यान निश्चित झाले आहे. बँकेची अशा बाबीसाठी स्वतंत्र विमा पॉलिसी कार्यरत आहे. यामुळे बँकेच्या व्यवहारावर याचा कोणताही परिणाम होणार नसल्याचे बँकेच्या व्हाईस चेअरमन माधुरी जोशी यांनी सांगितले.

दरम्यान राज्यात पंढरपूर अर्बन बँकेच्या 30 शाखा असून 2500 कोटी-हुन अधिक व्यवसाय आहे. झालेल्या अपहारामुळे सभासदांनी घाबरण्याचे कोणतेही कारण नसून बँकेची आर्थिक परिस्थिती मजबूत आहे. याबाबत आवश्यक ती खबरदारी घेण्यात आली असल्याचे बँकेचे सीईओ उमेश विरधे यांनी स्पष्ट केले.

## सचिन कल्याणशेट्टी पालकमंत्री होणार?

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**अक्कलकोट :** सचिन कल्याणशेट्टी यांना नाव मंत्रीपदाच्या चर्चेत आहे. तर ज्येष्ठाचा विचार झाल्यास पाचव्यांदा विजयी झालेले विजयकुमार देशमुख यांच्या नावाचा विचार होऊ शकतो. जिल्ह्यातील पाचही आमदार मुंबईतच मुक्कामी असणार आहेत. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात मंत्रिपदाची संधी मिळावी यासाठी दोन्ही देशमुखांचे प्रयत्न सुरू असल्याचे बोलले जात आहे. तर आपल्याला आता नाही तर पुन्हा कधी संधी मिळेल सांगता येत नसल्याने सचिन कल्याणशेट्टी यांनीही मंत्रिपदाची विशेषत: पालकमंत्रीपदासाठी जोरदार फिल्डिंग लावल्याचीही चर्चा आहे.

## सांगोल्यात २१ हजार ४८५ हेक्टरवर ज्वारीची पेरणी



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सांगोला :** सांगोला तालुक्यात रब्बी हंगामात ३९ हजार ३४१ हेक्टर क्षेत्रावर ८८. ४६ टक्के पेरण्या झाल्या आहेत. तालुक्यात २१ हजार ४८५ हेक्टरवर ५७. ३३ टक्के क्षेत्रावर रब्बी ज्वारीची सर्वाधिक पेरणी झाली आहे. २१ हजार ४८५ हेक्टर (५७. ३३ टक्के) क्षेत्रावर रब्बी ज्वारी, २ हजार ३५१ हेक्टर (२८६ टक्के) क्षेत्रावर गहू, १३ हजार ३२१ हेक्टर (२५८ टक्के) क्षेत्रावर मका, २ हजार ०२६ हेक्टर क्षेत्रावर (२६३ टक्के) हरभरा, इतर कडधान्य ३९ हेक्टर, २४ हेक्टर, मुईमूग ६३ हेक्टर, करडई ३२ हेक्टर अशा ३९ हजार ३४१ हेक्टर क्षेत्रावर पेरण्या झाल्या आहेत.

**करमाळा :** निंभोरेचे तात्यासाहेब कळसाईत व गोरख कळसाईत यांना देण्यात आला. पुण्यातील पत्रकार भवन येथे डॉ. अलका नाईक व डॉ. युवराज ठाकरे यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. परळी वैजनाथचे माजी नगराध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी, संजय कुलकर्णी, सारंग बालंगे, कल्पना तोडकर आदी यावेळी उपस्थित होते. तात्यासाहेब कळसाईत यांनी शेतीमध्ये उपयोगी अनेक अवजारांचे संशोधन केले असून जेऊर येथे त्यांचा श्रीनाथ इंजीनियरिंग वर्क्स या नावाचे शेती अवजारे बनवण्याचा वर्कशॉप आहे.

## निवडून आलेले रायगडावर जाणारे राज्यातील पहिले आमदार

# माढा मतदारसंघात परिवर्तनाची सुरुवात छत्रपतींच्या स्मारकाने होणार-आ.पाटील

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** मुंबई येथील तीन दिवसीय विधिमंडळाच्या अधिवेशनानंतर माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिजीत पाटील यांनी स्वराज्याची राजधानी गाठली आणि छत्रपतींच्या गादीसमोर नतमस्तक झाले. निवडून आल्यानंतर रायगडावर जाणारे राज्यातील पहिले आमदार अभिजीत पाटील हे आहेत. रायगडाच्या पावन स्थळावर छत्रपतींचा राज्याभिषेक झाला होता. याच ठिकाणी स्वराज्याचा संकल्प पूर्ण केला होता. या ठिकाणी छत्रपतींचे अनेक वर्ष वास्तव होते. या पवित्र ठिकाणी जाऊन आमदार अभिजीत पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे दर्शन घेतले. यावेळी अभिजीत पाटील यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की छत्रपतींनी हजारो मावळे घडवले आणि स्वराज्याची संकल्पना रुजवली. त्यांच्या प्रेरणेने पुढील पिढ्या घडल्या मराठा साम्राज्याने बलाढ्य शक्तींना परास्त करत अटकेपार झेंडा रोवला. संपूर्ण महाराष्ट्र स्वराज्याच्या आदर्श संकल्पनांवर उभा राहिला आहे. मला देखील माढा विधानसभेची मिळालेली जबाबदारी एक मावळा म्हणून पूर्ण करायची आहे.असा संकल्प करून आमदार अभिजीत पाटील यांनी छत्रपती शिवरायांच्या चरणी अर्पण करून आर्यशीर्वाद घेतल्याच्या भावना व्यक्त केल्या. ते पुढे बोलताना म्हणाले की माढा मतदारसंघात या परिवर्तनाची सुरुवात छत्रपतींच्या स्मारकाने होणार आहे. माढा मतदारसंघात छत्रपती शिवाजी महाराज यांचा एकही अश्वारूढ पुतळा नाही ही खंत कोणाच्याही मनात राहू देणार नाही असा विश्वास दिला. आमदार अभिजीत पाटील यांनी रायगडावर छत्रपतींचे दर्शन घेतल्यानंतर स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगडाचा इतिहास जाणून घेत असताना. महाराजांचे वंशज संभाजीराजे छत्रपती हे देखील योगायोगाने रायगडावर आले होते. यावेळी अभिजीत पाटील यांनी त्यांची आवर्जून भेट घेतली तसेच रायगडावर सुरू असलेल्या संवर्धन कार्याबाबत चर्चा केली. कोणतीही पूर्व सूचना न देता अचानक झालेली भेट आनंददायी ठरली असल्याच्या भावना आमदार पाटील यांनी व्यक्त केल्या. याप्रसंगी त्यांचे रायगड दर्शन सुरू असताना एका ठिकाणी शाळेतील विद्यार्थी इतिहास जाणून घेत असताना त्यांना दिसले. त्यामधील एका शिक्षकांनी आमदार अभिजीत पाटील यांना ओळखले आणि संवाद साधला. यावेळी त्यांनी विद्यार्थी आणि योगायोगाने भेट झालेले स्वराज्याचे वंशज यांच्याशी संवाद साधता आल्याचा आनंद व्यक्त केला. यावेळी आमदार अभिजीत पाटील यांनी रायगडावर इतिहास जाणून घेण्यासाठी काढलेल्या अशा संस्कारित सहलीसाठी शिक्षकांचे अभिनंदन करत त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, संभाजीराजे छत्रपती आणि भविष्यातील अनेक बालक छत्रपती यांची एकत्रित भेट म्हणजे इतिहास वर्तमान आणि भविष्य याचे एकत्रित दर्शन घेऊन नवी ऊर्जा घेऊन परतलो असल्याच्या भावना यावेळी आमदार अभिजीत पाटील यांनी व्यक्त केल्या.

## देगाव येथे तिघांवर अ‍ॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल




■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** उत्तर सोलापूर तालुक्यातील देगाव येथे तिघांवर अ‍ॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत कुमार कट्टीमनी (राहणार समता नगर ) यांनी सलगर वस्ती पोलिसात फिर्याद दिली आहे. त्यावरून आकाश पडसाळकर, युवराज पडसाळकर व आकाशची आई ( तिघेही रा. पडसाळकर वस्ती, गणेश नगर तांड्याजवळ, देगाव ) या तिघांविरुद्ध अ‍ॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी हे शेतातील पिकाला पाणी द्यायला गेल्यावर त्या ठिकाणी वरील तिघेजण आले. त्यांनी शिवीगाळ करीत फिर्यादीस दमदाटी केली. तसेच जातिवाचक शिवीगाळ केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. अधिक तपास पोलीस करीत आहेत.

## » Selected

## दोन बहिणींचा चिरडून मृत्यू



**मोहोळ :** मोहोळ तालुक्यातील आष्टे गावात ट्रॅक्टरखाली चिरडून दोन सख्ख्या बहिणींचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. या प्रकरणी ट्रॅक्टर चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ट्रॅक्टरवर बसण्यासाठी चढत असताना गिअर पडल्याने हा प्रकार घडला आहे. लहान बहिणीसह मोठी बहीण चाकाखाली चिरडल्याने दोघींचा मृत्यू झाला. निता राजु राठोड, अतिश्री राजु राठोड असे मृत झालेल्या दोन बहिणींची नावे आहेत.

## आपले सरकार सेवा केंद्रासाठी 318 उमेदवारांची निवड




**सोलापूर :** सोलापूर जिल्ह्यातील एकूण 330 रिक्त आपले सरकार सेवा केंद्रासाठी 2 हजार 998 अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त झाले. प्राप्त अर्जांची छाननी करून पात्र व अपात्र उमेदवारांची/केंद्राची अंतिम निवड यादी 3 डिसेंबर 2024 रोजी तयार करण्यात आली असून, सदर यादी https: //solapur. gov. in या वेबसाईटवर पाहण्यास उपलब्ध आहे. यात प्रशासनाने अत्यंत पारर्शकपणे प्रक्रिया राबवून मेरिट वर 318 उमेदवारांची निवड करण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हा प्रशासनाकडून आज देण्यात आली.

## निवेदन...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**पंढरपूर :** नेपतगाव येथील विविध कार्यकारी सोसायटी यांनी शेतकऱ्यांच्या उताऱ्यावर बोगस कर्ज काढले या प्रकरणाची चौकशी करण्यात यावी या मागणीचे निवेदन ग्रामस्थांनी सहाय्यक निबंधकांना दिले आहे.

## सर्व धर्म एकता मंचची निदर्शने



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर** : बांगलादेशात हिंदूंवर होत असलेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ सोलापुरात सर्व धर्म एकता मंचच्या वतीने डोक्याला व हाताला काळे रिबिन बांधून निदर्शने करण्यात आली. तसेच सरकारने योग्य पावले उचलावीत अशी मागणी सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्याकडे करण्यात आली. यावेळी दास शेळके, माजी उपमहापौर प्रमोद गायकवाड, विजय हत्तुरे आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना दिलेल्या निवेदनावर मंचच्या पदाधिकारी, सदस्य यांच्या स्वाक्षरी आहेत. पुढील काळात मंचच्या वतीने आंदोलन करण्यात येणार असल्याचेही सांगण्यात आले.

## पूर्वीच्या लोकप्रतिनिधींनी शहर बकाल केले



**मोहोळ :** मोहोळ शहराच्या विकासासाठीचा पुढील पन्नास वर्षाचा अभ्यासपूर्ण आराखडा तयार करून त्या दृष्टीने विकासाचे नियोजन केले जाईल. यापूर्वीच्या आमदाराने मोहोळ शहराच्या फायद्याचे कमी आणि स्वतःच्या फायद्याची निर्णय घेऊन शहर बकाल केले. त्यामुळेच संतापाचा उद्रेक होऊन मला सर्वसामान्यांनी मतदान केले. दोघांनी सदैव प्रयत्नशील राहून माझ्या लोकप्रतिनिधी पदाच्या कर्तव्याला मनापासून साथ द्यावी आणि मोहोळच्या सर्वांगीण विकासाचे स्वप्न पूर्ण करावे. असे प्रतिपादन आमदार राजू खरे यांनी केले आहे.




## सध्याचे उद्योजक अधिक सक्षम करायचेत



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माळशिरस :** खासदार नवउद्योजक विकास उपक्रमाचा उद्देश नवीन उद्योजक निर्माण करणे आणि सध्याचे उद्योजक अधिक सक्षम करणे हा आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनांबाबत माहिती देणे, बँकांकडून कर्ज मिळवून देण्यात मदत करणे आणि विविध उद्योग संस्थांशी करार करण्याची संधी उपलब्ध करून देणे हा मुख्य उद्देश आहे, असे प्रतिपादन माढा मतदारसंघाचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील केले.

## माळशिरसमध्ये नवा वाद रंगणार?

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माळशिरस :** जातवैधता प्रमाणपत्राच्या विषयावर काम सुरु शरद पवार गटाचे माळशिरसचे आमदार उत्तम जानकर आणि भाजपचे माजी आमदार राम सातपुते यांच्यात रंगलेला वाद राज्यभरात चर्चेला आहे. जानकर यांच्या मारकडवाडी प्रकरणातील भूमिकेची देशभरात चर्चा आहे. यादरम्यान, भाजपच्या नेत्यांनी उत्तम जानकर यांच्या जातवैधता प्रकरणावर काम सुरू केल्याची आहे. भाजपमधील जानकर विरोधी गटाने नुकतीच काही कागदपत्रे राम सातपुते यांच्या कार्यालयात पोहोचविली. ही कागदपत्रे दिल्लीपर्यंत जाण्याची शक्यता आहे. त्यानंतर काय कारवाई होणार याकडे लक्ष लागले आहे.

## महिलांच्या जागतिक लॉन टेनिस स्पर्धेचे उदघाटन



**सोलापूर :** सोलापूर जिल्हा लॉन टेनिस असोसिएशनच्यावतीने कुमठा नाका येथील लॉन टेनिस कोर्टवर आयोजित करण्यात आलेल्या महिलांच्या जागतिक लॉन टेनिस स्पर्धेचे उदघाटन यांच्या हस्ते उत्पादन शुल्क विभागाच्या अधिक्षक भाग्यश्री जाधव यांच्या हस्ते आज हवेत फुगे सोडून करण्यात आले. यावेळी संध्याराणी बंडगर, राम रेड्डी, शर्ली डिसोझा, मयूरा शहा, सिद्धार्थ गांधी, डॉ. शंतनू गांधी, डॉ. प्रदीप सिंघल, नितीन कन्नमवार, राजीव देसाई आदी उपस्थित होते.




आयुर्वेद शास्त्राच्या मताप्रमाणे गीर गाईचे दूध हे ह्युमिनिटीप्रधान तसेच लहान बालकांसाठी अत्यंत उपयुक्त असे आहे.

## ऊस दराचा तिढा अजूनही कायमच

# सोलापूर जिल्ह्यातील सर्वच्या सर्व ३३ कारखान्यांचे गाळप सुरु

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**सोलापूर :** जिल्ह्यातील शेतकऱ्यांना यंदा केंद्र सरकारने निश्चित केलेल्या ३४८५ रुपयांच्या एफआरपीशिवाय ज्यादा दर कारखानदारांकडून मिळणार नाही, अशी सद्यःस्थिती आहे. गाळप हंगाम १५ नोव्हेंबरपासून सुरू झालेला आहे.
मात्र बहुतेक कारखान्यांनी एफआरपीशिवाय उसाला प्रतिटन किती दर जास्त देणार हे स्पष्ट केलेले नाही. जिल्ह्यात एक लाख ४० हजार हेक्टरवर ऊस लागवड करण्यात आली आहे. केंद्र सरकारने १०.२५ एवढी रिकव्हरी निश्चित केली असून त्यानुसार साखर कारखानदारांना प्रतिक्विंटल ३४० रुपयांप्रमाणे शेतकऱ्यांना एफआरपी देणे बंधनकारक आहे. याशिवाय वाढीव पैसे द्यायचे की नाहीत हा कारखानदारांचा वैयक्तिक निर्णय असतो, अशी माहिती प्रादेशिक साखर सहसंचालक पांडुरंग साठे यांनी दिली.
यंदा ऊस दराची स्पर्धा पाहायला मिळाली नाही. अनेक कारखानदार विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात असल्याने आचारसंहितेमुळे त्यांनी त्या काळात दर जाहीर केलेला नाही. आता आचारसंहिता संपली असली तरी एफआरपीपेक्षा जास्त दर अनेकांनी जाहीर केलेला नाही. ऊसतोडीसाठी मजुरांच्या टोळ्या देखील यंदा फार दिसत नाहीत. अनेक शेतकऱ्यांना डोक्यावरील कर्जाचा भार हलका करण्यासाठी तोड लवकर यावी, यासाठी प्रयत्न करावा लागतो. शेतकरी संघटना शेतकऱ्यांच्या पदरात जास्त पैसे पडावेत म्हणून काय भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**सोलापूर :** विधानसभा निवडणुकीचे निकाल लागल्यानंतर राज्यात 'ईव्हीएम'वर होणाऱ्या मत प्रक्रियेवर संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू आहेत. राज्यात विविध भागात ईव्हीएम ऐवजी 'मतपत्रिके'वर मतदान प्रक्रिया राबवण्याची मागणी केली जात आहे. जनमानसातील संभ्रम दूर करण्यासाठी राज्य सरकारने पर्यायाने प्रशासनाने त्यामुळे योग्य पावले उचलावीत, अशी मागणी इंडिया अगेन्स्ट करप्शनचे (आयएसी) राष्ट्रीय अध्यक्ष आणि ओबीसी नेते हेमंत पाटील यांनी केली

## दि.१३ व १४ डिसेंबर रोजी स्वेरीत 'टेक्नो-सोसायटल २०२४' चे आयोजन

# या आंतरराष्ट्रीय परिषदेला उपस्थित राहणार देश-परदेशातील संशोधक

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** 'राज्यात तंत्रशिक्षण क्षेत्रात नवनवीन संकल्पना आणि व्यावसायिक शिक्षणातील स्वतंत्र 'पंढरपूर पॅटर्न' अमलात आणत असताना शुक्रवार, दि.१३ व शनिवार, दि.१४ डिसेंबर २०२४ या दोन दिवशी गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरींगमध्ये पाचवी आंतरराष्ट्रीय परिषद 'टेक्नो-सोसायटल २०२४' चे आयोजन करण्यात आले आहे. स्कूल ऑफ लाईफ सायन्सेस, पु. अ. हो. सोलापूर विद्यापीठ सोलापूर व स्वेरी, पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने पीएम- उषा या योजनेअंतर्गत या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या पाचव्या 'टेक्नो-सोसायटल २०२४' परिषदेसाठी सिंगापूर मधील एनयुएसचे डॉ.प्रल्हाद वडक्केपात व मलेशियातील हेल्फ विद्यापीठातील प्रा.डॉ. आर. लोगेश्वरन हे प्रमुख उदघाटक म्हणून लाभलेले आहेत तर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरचे कुलगुरू डॉ.प्रकाश महानवर हे अध्यक्षपद भूषविणार आहेत.

'टेक्नो-सोसायटल- २०२४' या परिषदेमध्ये पाणी, ऊर्जा, वाहतूक, गृहनिर्माण आणि स्वच्छता यासाठी प्रगत तंत्रज्ञान जैव आणि सामाजिक अनुप्रयोगांसाठी मेकाट्रॉनिक्स, मायक्रो-नॅनो संबंधित, रासायनिक आणि भौतिक प्रक्रिया, व्यावसायिकदृष्ट्या यशस्वी ग्रामीण आणि कृषी आधारित तंत्रज्ञान, उपयोज्य पर्यावरण किंवा आरोग्य काळजी संबंधित तंत्रज्ञान, शाश्वत तंत्रज्ञानासाठी समग्र दृष्टीकोन, आयसीटी आधारित सामाजिक तंत्रज्ञान आणि लॅब-स्तरीय प्रगत सामाजिक तंत्रज्ञान सेन्सर, प्रतिमा आणि डेटा-चलित सामाजिक तंत्रज्ञान, ग्रामीण आणि कृषी रोजगार निर्मितीसाठी तंत्रज्ञान, सामाजिक अनुप्रयोगांसाठी उत्पादन आणि फॅब्रिकेशन प्रक्रिया, न्यूट्रास्युटिकल्स आणि पारंपारिक औषधे, हेल्थ केअरमधील कृत्रिम बुद्धिमत्ता, प्रणाली, नवीन औषध वितरण प्रणाली, जीवशास्त्र आणि लस विकास आणि बायोसेन्सर, अक्षय ऊर्जा स्रोत, वाणिज्य आणि व्यवस्थापनातील अलीकडील ट्रेंड आणि आयुर्वेद तसेच संशोधनावर प्रकाश टाकणार आहेत. या परिषदेत 'कि नोट स्पीकर' म्हणून कन्नूर (केरळ) मधील विनोय विष्णू वडक्केपात, गव्हर्मेंट कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कराडचे प्राचार्य डॉ. विनायक कुलकर्णी, आयआयटी बॉम्बेचे डॉ. परमेश्वर उदमले, गुरुनानक देव कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, बिदर (कर्नाटक) चे प्रा. वीरेंद्र डाकुलगी, कृषी विद्यापीठ, अहिल्यानगरचे माजी प्राचार्य डॉ. डी. एस. गोरंटीवार, आयआयटी जोधपुरच्या डॉ. साक्षी धानेकर, आयआयटी बॉम्बेचे नरेंद्र शहा, पू.अ.हो. सोलापूर विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा तर ऑनलाईन माध्यमातून यूएस मधील डॉ.विशाल धमगाये, अमेरिकेमधून जॉर्ज मेशन विद्यापीठाच्या डॉ. सपना गंभीर, ताश्कंद इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नोलॉजी, उझबेकिस्थानचे डॉ. बोथीर उस्मोनोव्ह, देला सॅली विद्यापीठ फिलिपिन्सचे लॉव सायमन चाटीमबंग, दुबई मधून अमेटी विद्यापीठातील डॉ.व्यंकट रेड्डी पोलुरू, आयआयटी जम्मु चे डॉ. विजयकुमार पाल, मलेशियातील जालन विद्यापिठाचे डॉ. यीप किम हु, आयआयटी भुवनेश्वरचे डॉ. गौरव बरतार्या यांच्यासह स्वेरीचे डॉ. प्रशांत पवार, सहसमन्वयक डॉ. व्ही. बी. पाटील, प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे, तज्ज्ञ संशोधक व अभ्यासक सहभागी होणार आहेत. 'टेक्नो- सोसायटल' या आंतरराष्ट्रीय परिषदेचा फायदा समाजाच्या उद्धारासाठी करायचा यासाठी 'टेक्नो- सोसायटल' या परिषदेची खरी सुरुवात झाली. यंदा होणाऱ्या परिषदेसाठी जवळपास ४६० प्राध्यापक व संशोधकांनी नोंदणी केली असून जवळपास १०५० प्रवेशिका प्राप्त झाल्या आहेत. यापूर्वी सन २०१६, २०१८, २०२० व २०२२ या चार वर्षी 'टेक्नो-सोसायटल' या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या माध्यमातून स्वेरीमध्ये समाजाशी निगडित असलेल्या समस्या सोडवण्यासाठी आणि ग्रामीण भागातील तंत्रज्ञानाला चालना मिळण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवरील परिसंवाद आयोजित केले होते. 'टेक्नो- सोसायटल २०१६', 'टेक्नो-सोसायटल २०१८' नंतर तिसरी आंतराष्ट्रीय परिषद 'टेक्नो-सोसायटल २०२०' ही जागतिक कोरोना महामारीमुळे ऑनलाईन पद्धतीने झाली तर चौथी 'टेक्नो-सोसायटल २०२२' ऑफलाईन प्रकारे पार पडली. यातील संशोधनपर लेख स्प्रींजर या आंतरराष्ट्रीय प्रकाशनाच्या माध्यमातून प्रसिद्ध करण्यात आले आहेत. टेक्नो-सोसायटल २०२४' ही आंतरराष्ट्रीय परिषद स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. प्रशांत पवार यांच्या नेतृत्वाखाली होत असून परिषदेचे समन्वयक म्हणून संशोधन अधिष्ठाता डॉ.अमरजित केने हे काम पहात आहेत. मागील चारही परिषदेच्या तुलनेत यंदाच्या परिषदेला प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे. या परिषदेच्या यशस्वीतेसाठी स्वेरी परिवारातील सर्व सदस्य परिश्रम घेत आहेत.

## उमेश पाटील शरद पवार गटात प्रवेश करणार?



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मोहोळ :** विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर अजितदादा गटाचे प्रदेश प्रवक्ते उमेश पाटील यांनी राजीनामा दिला. त्यानंतर शरद पवार गटात प्रवेश करण्याची तयारी केली होती. मात्र, त्यांचा प्रवेश झाला नव्हता. त्यांच्या प्रवेशाला अनेकांनी विरोध दर्शविला होता. निवडणुकीनंतर परिस्थिती वेगळी राहिली. महायुतीची सत्ता कायम राहिल्याने आता उमेश पाटलांचा प्रवेश होणार की नाही, याची चर्चा सुरू झाली आहे. शरद पवार गटात प्रवेश न केल्यास पुन्हा अजितदादांकडे जाणार याची आता मोहोळ तालुक्यात सुरू झाली आहे.

» पान १ वरुन

## ईव्हीएम मतदान म्हणजे संविधानाने...

गांधी यांनी नवतंत्रज्ञान भारतात आणले आहे. ईव्हीएम मशीन कॉंग्रेसच्या काळात आले आहे. गेली ७० वर्ष शरद पवार राजकारणात काम करत

आता त्यांनी शांत झोप घ्यायला हवी. २०१९ मध्ये मतदान यंत्रावर मतदान घेण्यात आले. यावेळी महाविकास आघाडीची सत्ता आली होती, हे शरद पवार विसरले असल्याचे दिसून येत आहे.

शरद पवार व राष्ट्रवादी कॉंग्रेस ही गुंडांची टोळी आहे. त्यांना गाडण्याचे काम मुख्यमंत्री फडवणीस यांनी केले आहे. मारकटवाडीच्या विकासासाठी आपण निधी देण्यास तयार आहोत, माजी मंत्री सदाभाऊ खोत यांनी आपल्या भाषणात सांगितले.

माळशिरस विधानसभा मतदारसंघातीलमारकडवाडी गावात गेल्या ७० वर्षापासूनविकास झाला नव्हता; मात्र माजी आमदार राम सातपुते यांनी २१ कोटी रुपयांचा निधी दिल्याने विविध विकासकाने झाली आहेत.

या गावात एसटी येत नव्हती; मात्र आता येथे हेलिपॅड उतरले आहे.माळशिरस विधानसभा मतदार संघात महाविकास आघाडीने उत्तम जानकर यांना तर महायुतीने माजी आमदार राम सातपुते यांना उमेदवारी दिली. या मतदार संघात अटीतटीची दुरंगी लढत झाली. यात उत्तम जानकर विजयी झाले. उत्तम जानकर यांचे माळशिरस विधानसभा मतदारसंघात अनेक गावात वर्चस्व आहे. मात्र मारकडवाडी गावात उत्तम जानकर यांना कमी मते मिळाली. यामुळे ते नाराज झाले. हे पाहून ग्रामस्थांनी ईव्हीएम मशीनवर संशय व्यक्त करून पुन्हा बॅलेट पेपरवर मतदान घेण्याची आहेत.

तयारी सुरू केली, तसा ठराव केला. यानंतर हे गाव देशपातळीवर प्रसिद्धीच्या झोतात आले. मात्र बॅलेट पेपरवर निवडणूक घेण्यास प्रशासनाने बंदी घातली. यामुळे मतदान होऊ शकले नाही.माळशिरस विधानसभा मतदार संघातील गारकडवाडी गावची लोकसंख्या ४००० आहे. या गावात गेल्या ७० वर्षात म्हणावा तसा विकास झाला नव्हता; मात्र तत्कालीन आमदार राम सातपुते यांनी या गावाचा विकास करण्यासाठी २१ कोटी रुपयांचा निधी दिला. यातून अनेक विकास कामे करण्यात आली आहेत. या गावा एसटी येत नव्हती. आता येथे हेलिपॅडची सोय करण्यात आली आहे. असा विविध प्रकारे माजी आमदार राम सातपुते यांनी मारकडवाडीत विकास केला आहे.

## अशी राम सातपुते सारखी मंडळी मोहिते...

शरद पवार यांचेवर झालेल्या टीकेला उत्तर देताना ते म्हणाले की, कावळ्याच्या श्रापाने कधी गुरे मरत नसतात. पवार साहेब हे पवार साहेब आहेत. भल्याभल्यांना त्यांनी आयुष्यात लोळवले आहे. पवार हे महाराष्ट्राचे पहाड आहेत त्यामुळे अशी टीका करणारी पाच उंदरे दररोज पवार साहेबांच्या नाष्ट्याला असतात. त्यामुळे जोपर्यंत बॅलेट पेपरवर मतदान होत नाही तोपर्यंत हे आंदोलन सुरूच राहणार आहे.

दिल्ली येथे ईव्हीएम विषयावर शरद पवार यांच्या बैठकीला ते गेले होते त्यावेळी प्रसार माध्यमांशी ते बोलत होते.

## विधान परिषदेवर कोणाची वर्णी लागणार

विधानसभा मतदार संघातून राम सातपुते यांचा पराभव झाला. तर विधानसभा निवडणुकीच्या अगोदर माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी निवडणूक लढविण्याची तयारी सुरू केली होती. यामुळे पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघात बंडखोरी होऊ नये म्हणून भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी परिचारक यांची भेट घेऊन त्यांना विधान परिषदेवर घेण्यात येईल असा शब्द दिला आहे. यामुळे आता विधान परिषदेवर निवड करण्यासाठी चार जण इच्छुक आहेत. यामुळे विधान परिषदेवर कोणाची निवड होणार याकडे लक्ष लागले आहे. विधान परिषदेवर पाच जणांची निवड करण्यात येणार आहे. यावर कोणा-कोणाची वर्णी लागणार याबाबत चर्चा रंगू लागली आहे.

## जिल्हा मध्यवर्ती बँकेची 35 जणांना नोटीस



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** बेकायदेशीर कर्ज वाटप प्रकरणी जबाबदार धरलेल्या 35 लोकांना सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेने नोटीस बजावली आहे. यामध्ये जिल्ह्यातील अनेक नेत्यांसह 32 संचालक, 2 अधिकारी व 1 चार्टड अकाउंटंट यांचा समावेश असून नोटीस मध्ये दिलेली रक्कम व्याजासह पंधरा दिवसात भरावी असे नोटिसमध्ये म्हंटले आहे. या 35 जणांना 2009 ते 2014 या कालावधीत वाटप केलेल्या 238 कोटी 43 लाख 999 हजार रुपये इतक्या कर्जाला जबाबदार धरण्यात आले आहे. विभागीय सहनिबंधक योगीराज सुर्वे यांनी जिल्हा मध्यवर्ती बँकेला वसुलीचे आदेश दिले आहेत. त्यामुळे खळबळ उडाली आहे.

## सत्कार...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**पंढरपूर :** माढा विधानसभा मतदारसंघाचे नूतन आमदार अभिजीत आबा पाटील यांनी आमदारकीची शपथ घेतल्यानंतर राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची कुटुंबासह भेट घेतली. यावेळी अजित पवार यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी आ. अभिजीत पाटील यांचे कुटुंबिय उपस्थित होते.

## मी कोणत्याही पक्षात जाणार नाही



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**अक्कलकोट :** अक्कलकोट विधानसभा निवडणुकीमध्ये मी उमेदवार नसलो असतो तर कॉंग्रेसचा मानहानिकारक पराभव झाला असता, असा दावा करीत, मी कॉंग्रेस सोडून इतर कुठल्याही पक्षात जाणार नाही. कार्यकर्त्यांनी अफवांवर विश्वास ठेवू नये. मी कॉंग्रेसमध्येच राहून यापुढे नवीन नेतृत्व पुढे आणणार असून, कार्यकर्त्यांच्या पाठीशी खंबीरपणे राहणार असल्याची ग्वाही माजी राज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांनी दिली. निवडणूकीत हार-जीत ही होत असतेच ती बाजूला करुन कामाला लागा असे उद्गार काढले.

## सिंहगड इन्स्टिट्यूटने पटकावला द्वितीय क्रमांक



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आयोजित पुणे विभागीय युवा महोत्सव 2024 मध्ये सोलापुरातील एनबीएन सिंहगड इन्स्टिट्यूटने विज्ञान व तंत्रज्ञान नवसंकल्पना या प्रकारात द्वितीय क्रमांक पटकाविला. याबद्दल महाविद्यालयास सन्मानपत्र, सन्मानचिन्हे, रोख रक्कम देवून गौरविण्यात आले. या विज्ञान प्रदर्शनात सिंहगड इन्स्टिट्यूटच्या आदित्य बनसोडे, रितेश सुलाखे, ओंकार जगताप या तीन विद्यार्थ्यांनी 'कृत्रिम बुद्धिमत्ता वापरून आभासी माउस' हा प्रकल्प सादर केला. यास विभागीय स्तरावर द्वितीय क्रमांक मिळाला.

## वळसंग जवळील अपघातात तरुण गंभीर जखमी




■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** भरधाव वेगात निघालेल्या टेम्पोने दुचाकीस्वारास पाठीमागून जोराची धडक दिली. या धडकेत श्रीशैल कल्लप्पा सुतार (वय 46 राहणार वळसंग, तालुका दक्षिण सोलापूर) हे गंभीर जखमी झाले आहेत. हा अपघात 7 डिसेंबर 2024 रोजी सकाळी 8 वाजण्याच्या सुमारास सोलापूर -अक्कलकोट रस्त्यावरील वळसंग जवळ घडला. याबाबत योगीराज मल्लिनाथ सुतार (वय 27 राहणार वळसंग ) यांनी पोलीस ठाण्यामध्ये फिर्याद दिली आहे. त्यानुसार रमेश कल्लाप्पा हुबळी (वय 42 राहणार मजरेवाडी, स्वागत नगर सोलापूर ) याच्या विरोधात वळसंग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

## रूपा भवानी मंदिराजवळील ओढ्यात आढळले नवजात अर्भक



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** सोलापुरातील रूपा भवानी मंदिर परिसरात असणाऱ्या ओढ्यात आज एक जन्मलेले नवजात अर्भक आढळल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. या अर्भकाचे दोन्ही पायाचे लचके कुत्र्याने तोडले असल्याचे दिसून येत आहे. पोलीस घटनास्थळी पोहोचले असून याबाबतचा पुढील तपास सुरू आहे. दरम्यान ओढ्यात नवजात अर्भक पडल्याची बातमी शहरभर वाऱ्यासारखी पसरली. त्यानंतर हे अर्भक पाहण्यासाठी बघ्यांची मोठी गर्दी झाल्याची दिसून आले. घटना स्थळी पोलीस दाखल होताच बघ्यांची गर्दी हटविण्यात आली. त्यानंतर अर्भक ताब्यात घेऊन हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे.

» Selected

## टॉवेल कामगाराचा मृतदेह विहीरीमध्ये तरंगताना आढळला

**सोलापूर :** टॉवेल कामगार असलेल्या एका 47 वर्षीय इसमाचा पूर्व भागातील म्हाडा विहिरीमध्ये मृतदेह तरंगताना आढळल्याने एकच खळबळ उडाली आहे. नागेश पेंटप्पा कोंडा ( वय 47 राहणार नवीन विडी घरकुल, कुंभारी, सोलापूर) असे मयत इसमाचे नाव आहे. नागेश कोंडा हे सफाईचे काम करणाऱ्या लोकांना सोमवारी दुपारी दीडच्या वाजण्याच्या सुमारास विहिरीमध्ये बेशुद्धावस्थेत तरंगताना आढळून आले. एमआयडीसी पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून शासकीय रुग्णालयात त्यांना दाखल केले. डॉक्टरांनी तपासणी करून त्यांचा मृत्यू झाल्याचे घोषित केले.

## जिल्हाधिकाऱ्यांकडून कराटेपटूंना कौतुकाची थाप



**सोलापूर :** सोलापुरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी नुकत्याच दक्षिण आफ्रिकेतील दर्बन येथे पार पडलेल्या अकराव्या कॉमनवेल्थ कराटे स्पर्धेत भारतीय संघातून पदकांची लयलूट केलेल्या सोलापूरच्या खेळाडूंना कौतुकाची थाप दिली. सोलापूर मधील रुद्र अकॅडमी ऑफ मार्शल आर्टस व योग संस्थेच्या भुवनेश्वरी सुरेश जाधव, आर्या यादव, संकेत धन्नाईक, समिहान कुलकर्णी, अक्षिता कुलकर्णी व आदित्य पालिया या सहा कराटेपटूंनी पदके जिंकून भरघोस यश मिळविल्याबद्दल तसेच ज्युनिअर टीमचे कोच मिहिर जाधव यांचा उत्तम प्रशिक्षक म्हणून सत्कार केला.

## शाखा व्यवस्थापक अमित देशपांडे यांचे विरोधात गुन्हा दाखल

# पंढरपूर अर्बन को-ऑप.बँकेच्या बारामती शाखेत शाखाधिकाऱ्याने केला 9 कोटी रुपयांचा अपहार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पंढरपूर अर्बन को-ऑप बँक लि. पंढरपूर या बँकेच्या बारामतीतील शाखाधिकाऱ्याने बनावट कागदपत्रांच्या आधारे या बँकेत सुमारे 9 कोटी 3 लाख 361 रुपयांचा अपहार केला आहे. अमित प्रदीप देशपांडे (रा. सहयोग सोसायटी समोर, गुरुसदन हौसिंग सोसायटी, बारामती) या शाखाधिकाऱ्याविरोधात शहर पोलीस ठाण्यात विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून याप्रकरणी बँकेच्या मुख्य शाखेकडून कृष्णकुमार पुरुषोत्तम पेंडाल (रा. कोर्टी रोड, परिचारकनगर, पंढरपूर, जि. सोलापूर) यांच्याकडून फिर्याद देण्यात आली आहे.

ते मुख्य कार्यालयात व्यवस्थापक म्हणून काम करतात. पंढरपूर बँकेच्या संपूर्ण राज्यात 30 शाखा आहेत. बारामती येथे भिगवण रस्त्यावर जळोची येथेही एक शाखा आहे. तेथे अमित देशपांडे हे शाखाधिकारी म्हणून काम करत आहेत. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी उमेश विरधे यांनी ताळेबंदपत्रकाचे अवलोकन केले असता बारामती शाखेत संशयास्पद व्यवहार होत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी फिर्यादीला या संदर्भात तपासणी करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार तपासणी केली असता त्यात ही बाब स्पष्ट झाली आहे.




देशपांडे यांनी पदाचा गैरवापर करत तसेच कॅशिअर कम क्लार्क साधना कळंत्रे यांच्या कोडचा वापर करत बनावट कागदपत्रे तयार केली. ती खरी असल्याचे भासवत बँकेत अपहार व अफरातफर केली. बारामती शाखेच्या सस्पेन्स रिसिव्हेबल खात्यातून अधिकार नसताना 2 कोटी 30 लाख रुपये परस्पर उचल करून ती त्यांनीच उघडलेल्या धन्वंतरी नागरी सहकारी पतसंस्थेच्या खात्यात टाकली. बँक ऑफ बडोदा येथे भरणा करण्यासाठी 31 लाख रुपये काढत त्या रकमेची परस्पर विल्हेवाट लावली आहे. धन्वंतरी पतसंस्थेच्या नावे 5 बनावट ओडीटीडीआर खाते उघडून त्यातील 3 कोटी 23 लाख 71 हजार 897 रुपये स्वःतच्या फायद्यासाठी वापरले आहेत.

तसेच बारामती शाखेतील ग्राहकांचे सोने तारण कर्ज खाते प्रकारामध्ये 83 खातेदारांचे बँकेत ठेवलेले खरे दागिने काढून तेथे बनावट दागिने ठेवले असून खरे दागिने बाहेरील फायनान्स कंपन्यांना देत त्यावर कर्ज काढले आहे. 10 ग्राहकांच्या नावे बनावट खाती काढली आहेत. त्यावर बनावट सह्या करून त्या खात्यावर कर्ज वितरित केल्याचे व त्या बदल्यात सोने ठेवल्याचे दाखवून त्यांच्या नावे बँकेत बनावट सोने ठेवले आहे. त्याद्वारे 37 लाख 56 हजार 803 रुपये स्वतःसाठी वापरले आहेत.

बँकेतील सोने तारण कर्ज खाते प्रकारामध्ये 3 कोटी 18 लाख 37 हजार 464 रुपयांचा अपहार केला आहे. असा एकूण 9 कोटी 3 लाख 361 रुपयांचा अपहार करत बँकेची फसवणूक केली असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. याप्रकरणी पोलीस निरीक्षक विलास नाळे पुढील तपास करीत आहेत.

## मारहाण विनयभंग प्रकरणी गुन्हा दाखल




■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मंगळवेढा :** जिल्ह्यातील लोक मली घाबरतात मी बऱ्याच जनांना कामाला लावले आहे. असे म्हणून मारहाण करून 7 लाखाचे पाणी फिल्टर सामान व 1 लाखाचे मोबाईल चोरून नेल्याप्रकरणी जनहित शेतकरी संघटनेचे अध्यक्ष प्रभाकर देशमुख यांच्यासह 5 जनावर विनयभंग व मारहाण प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. मंगळवेढा परिसरात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस करीत आहेत.

## जामगावमधून चक्क चारचाकी वाहन चोरीला




**बार्शी :** तालुक्यातील जामगाव (आ) येथील रामेश्वर विठ्ठल काळे (रामा ) यांची अशोक लेलंड एमएच 13 सीयु 9111 नंबर असलेली, चार चाकी मालवाहतूक गाडी जामगांव (आ )येथून चोरीला गेलेली आहे. दरम्यान, सीसीटीव्हीमध्ये, कुसलंब टोलनाक्यावर मध्यरात्री 3 वाजताच्या सुमारास गाडी दिसून आल्याचे वाहन मालकांनी सांगितले. याबाबत पोलीस तक्रार दिली आहे. अधिक तपास पोलीस करत आहेत.

